# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य परिचर्या व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रम (3 वर्षे)

## (महिला उमेदवारांकरीता)

## **प्रवेश नियम** – 2025 - 2026

Scanned with OKEN Scanner

# बृहन्मुंबई महानगरपालिका

बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत चालविण्यात येत असलेल्या खालील परिचर्या प्रशिक्षण शाळेतील सामान्य परिचर्या व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रम (तीन वर्षे) GNM (New Course) {महिला उमेदवारांकरीता}

1. डॉ.रू.न.कूपर रूग्णालय,जुहू विलेपार्ले, मुंबई – 400 056, फोन नं.-26207254
2. श्री हरीलाल भगवती रुग्णालय, बोरीवली, मुंबई – 400 103, फोन नं.- 28932461
3. रा.ए.स्मारक रुग्णालय, परळ, मुंबई – 400 012, फोन नं.-24136051
4. बा.य.न.नायर धर्मा रुग्णालय, ए.एल.नायर रोड, मुंबई - 400 008, फोन नं.23081490-99
5. लो.टि.म.स.रुग्णालय, सायन, मुंबई – 400 022, फोन नं.24076381 – 90

## प्रवेश नियम

१) उपरोक्त अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मार्गदर्शित केलेल्या सुचनांचे पालन करत ONLINE (संगणकीय) पध्दतीने परिपूर्णरित्या भरुन संकेत स्थळावर सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जाचे नमूद केलेले शुल्क संकेतस्थळावर सादर केलेल्या बँक खात्यामध्ये जमा करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने परिपूर्णरित्या भरलेला अर्ज निश्चित केलेल्या दिनांकास व वेळेत ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. विहित तारखेनंतर व वेळेनंतर अर्ज भरता येणार नाही. प्रवेश प्रक्रियेविषयी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर योग्य माहिती उपलब्ध करून दिली जाईल व तसेच ONLINE अर्जाची किंमत खुल्या प्रवर्गासाठी रु.616/- +जीएसटी 18% (एकूण रु.727/-) सर्वकरांसहीत (CGST – 9% & SGST 9%) आणि मागासवर्गीयांसाठी रु.411/- +जीएसटी 18% (एकूण रु.485/-) सर्वकरांसहीत (CGST – 9% & SGST 9%) आकारण्यात येईल.

२) वयोमर्यादा - प्रवेश वर्षी 31.07.202५ पासून रोजी उमेदवाराचे वय 17 वर्षापेक्षा कमी व 35 वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) शैक्षणिक अर्हता – उमेदवार महाराष्ट्र राज्य , उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (10 वी + 11 वी + 12 वी ) शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा शासन मान्य संस्थेमधून प्राधान्याने फीजीक्स, केमेस्ट्री व बायोलॉजी या शास्त्र विषयांसह कमीत कमी 40 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मात्र मागासवर्गीय गटातील उमेदवारांच्या बाबतीत किमान 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध झाले नाहीत, तर महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची कला शाखा व त्यानंतर वाणिज्य शाखा या क्रमाने आणि कोणत्याही विषयातील उच्च माध्यमिक परीक्षा (10 वी + 11 वी + 12 वी) कमीत कमी 40 टक्के गुणांनी उत्तीर्ण करणाऱ्या खुला गटातील उमेदवारांचा व कमीत कमी 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या मागासवर्गीय गटातील उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

1. वरीलप्रमाणे अर्हता परीक्षा जास्तीत जास्त 3 प्रयत्नांत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचाही प्रवेशासाठी विचार केला जाईल. परंतु अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या प्रत्येक प्रयत्नांचे 5 गुण, 12 वी अथवा समतुल्य परीक्षेच्या एकूण गुणांतून कमी करण्यात येतील.
2. जे उमेदवार शासनमान्य विद्यापीठातून बी.एस.सी. (फीजीक्स, केमेस्ट्री व बायोलॉजी) पदवी किंवा एम.एस.सी. पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असतील त्यांचे बाबतीत त्यांच्या १२ वी अथवा समतुल्य परीक्षेच्या एकूण गुणात 5 गुण वाढविण्यात येतील.
3. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम परिक्षा किंवा उच्चतम 50 गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.
4. या अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या जागांतून सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका (**Auxiliary Nurse Midwifery**) सुधारीत अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ (**Maharashtra State Board Of Nursing and Paramedical Education recognised**) महिला उमेदवारांसाठी 5 टक्के जागा राखीव असतील. मात्र असे उमेदवार आवश्यक अनु.क्र.3 येथे नमूद केलेली (10 वी + 11 वी + 12 वी) अर्हता धारण करीत असावेत व या अभ्यासक्रमाबाबतच्या अन्य अटींची पूर्तता करीत असावेत. कोठेही सेवेत असलेल्या तसेच संबंधित संस्थेतून या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीने येणा-या सदर जागांवरील उमेदवारांना कोणतेही विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही. तथापि, जे उमेदवार कोठेही नोकरीला नसतील त्यांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील. मात्र त्यासाठी त्यांना विहीत केलेल्या प्रपत्रात रु.100/- च्या मुद्रांक पत्रावर प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट – 1) द्यावे लागेल. या जागांकरीता जर असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर जागा उर्वरीत जागात मिळविण्यात येतील.
5. 3 वर्षाचा सामान्य परिचर्या व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रमामध्ये अभ्यासक्रमाचा कालावधी व अभ्यासक्रमाचे विषय भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्या ठरावासापेक्ष.
6. 1. **अर्जासोबत खालीलप्रमाणे साक्षांकित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे,**

1. शाळा सोडल्याचा दाखला

2. (10 वी + 11 वी + 12 वी) परीक्षांच्या गुणपत्रिका व (10 वी + 11 वी + 12 वी) ची उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र, 12 वी पेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता असल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
3. अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो
4. 12 वी कितव्या प्रयत्नात उत्तीर्ण करण्यात आली त्याबाबत शाळा किंवा महाविद्यालयाचे प्रमाणपत्र
5. अधिवास दाखला (DOMICIL CERTIFICATE) व भारतीय नागरिकत्वाच्या (नॅशनॅलिटी) दाखल्याची साक्षांकित प्रत.
6. आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र, किंवा वैधता प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जाची पोचपावती तसेच प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र.
7. आधार कार्ड आणि पॅन कार्ड
8. अंतर (GAP CERTIFICATE) आवश्यक असल्यास (10 वी ते 12 वी दरम्यान तसेच 12 वी नंतर)
9. विवाहाचा दाखला आवश्यक असल्यास

2. **विशेष सूचना** :-

अ) जर उमेदवार हा अनुसूचित जाती, नवबौध्द (अनुसूचित जातीमधील धर्मांतरीत) अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागासवर्गीय वा विशेष मागासप्रवर्ग असून तो राखीव प्रवर्गात प्रवेश घेत असेल तर त्याने त्यांच्या प्रवेश अर्जासोबत तो ज्या विभागातील रहिवासी असेल तेथील विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेले (जात, उपजात याचा स्पष्ट उल्लेख असलेले) प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र तसेच उन्नत व प्रगत व्यक्तीगटात मोडत नाहीत या संबंधीचे आवश्यक ते सक्षम प्राधिकरणाने दिलेले विहीत प्रमाणपत्र तदपुष्ठयर्थ **जोडावयास हवे**. तसेच जात वैधता प्रमाणपत्र पुढील 6 महिन्यात न दिल्यास उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्याचे अनिवार्य असावे.

ब) उमेदवाराने अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती सादर कराव्यात. मूळ प्रमाणपत्रे प्रवेशाच्या मुलाखतीचे वेळी पडताळणीकरीता सादर करावीत. आवश्यक पडताळणीनंतर मूळ प्रमाणपत्रे उमेदवारास परत करण्यात येतील. मूळ प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या छाननी वा पडताळणीच्या वेळी कोणतीही त्रुटी, चुकीची माहिती वा गुणपत्रिकेत अनधिकृत खाडाखोड अथवा बदल केल्याचे आढळून आल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज तात्काळ नाकारण्यात येईल. किंवहुना त्याला आधीच प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

क) प्रवेशासाठी केलेल्या दाव्यानुसार आवश्यक असलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती प्रवेश अर्जासोबत जोडण्यात याव्यात. मूळ प्रवेश अर्जात केलेल्या दाव्या व्यतिरिक्त नंतर केलेला कोणताही दावा विचारात घेण्यात येणार नाही.

ड) प्रशिक्षणाकरीता पात्र ठरविण्यात आलेला उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. याकरीता त्या संस्थेत उमेदवाराने अर्ज केला आहे त्या संस्थेत त्याची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर व शारीरीकदृष्टया व मानसिकदृष्टया सक्षम ठरविल्यानंतरच उमेदवार परिचर्या प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल.

इ) सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता फक्त भारतीय राष्ट्रीयत्व धारण करणारे परंतु महाराष्ट्रात वास्तव्यास असणारे उमेदवार पात्र असतील. कालांतराने जर एखाद्या उमेदवाराने भारतीय राष्ट्रीयत्व धारण केलेले नाही असे आढळून आले तर त्याचा प्रवेश कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय रद्द करण्यात येईल व तो दंडात्मक कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

10) **निवड प्रक्रिया** :-

1) प्राप्त झालेल्या अर्जातून उमेदवारांची निवड बारावी परीक्षेत मिळविलेल्या एकूण गुणांवर आधारीत गुणवत्तेनुसार काटेकोरपणे केली जाईल.

2) **समवंध** :-

उमेदवारांचे समान गुण झाल्यास त्यामधून उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे निकष लावण्यात येतील.

1) प्रथम प्राधान्य ज्या उमेदवाराचे 12 वी (10 वी + 11 वी + 12 वी) परीक्षेतील पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचे एकत्रित गुण जास्त असतील त्यास राहील.

2) द्वितीय प्राधान्य ज्या उमेदवाराचे 12 वी (10 वी + 11 वी + 12 वी) परीक्षेतील पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र व जीवशास्त्र व इंग्रजी या विषयांचे एकत्रित गुण जास्त असतील त्यास राहील.

3) तृतीय प्राधान्य ज्या उमेदवाराचे 10 वी परिक्षेत सर्व विषयांचे एकूण गुण जास्त असतील त्यास राहील.

4) वरील सर्व अटी राखीव जागांवरील उमेदवारांच्या निवडीसाठीही लागू राहतील.

5) भूदल, नौदल व वायुदल सेवेत असलेल्या पूर्ण सेवेनंतर सेवानिवृत्त झालेल्या किंवा सेवेत असताना मृत्यु पावलेल्या, त्याचप्रमाणे परमवीरचक्र, वीरचक्र, महावीरचक्र इत्यादी संरक्षण दलातील मानचिन्ह विजेते तसेच देशाच्या सीमाक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी अग्निशमन दलाचे पदक वा शौर्य पुरस्कार आदिनी सन्मानित झालेल्या व्यक्तीचे पदनाम विचारात न घेता त्यांच्या पाल्यांना अन्य सर्व बाबीत समरुप राखूनच निवड करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

11) मागासवर्गीय उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण राहील.

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1 | अनुसुचित जाती | (अ.जा.) 13.00% |
| 2 | अनुसूचित जमाती | (अ.ज.) 7.00% |
| 3 | विमुक्त जाती (अ) | वि.जा.(अ) 03.00% |
| 4 | भटक्या जमाती (ब) | भ.ज.(ब) 02.50% |
| 5 | भटक्या जमाती (क) | भ.ज.(क) 03.50% |
| 6 | भटक्या जमाती (ड) | भ.ज.(ड) 02.00% |
| 7 | इतर मागासवर्गीय | इमाव 19.00% |
| 8 | विशेष मागास प्रवर्ग | विमाप्र 2.00% |
| 9 | E.W.S.**(आर्थिक दृष्टया दुर्बळ)** | 10.00% |
| 10 | एसईबीसी | 10.00% |
| | **एकूण** | 72.00% |

**महत्वाची टिप** :-

वरील प्रवर्गापैकी (3) ते (10) या प्रवर्गातील उमेदवार जर प्रगत वर्गात मोडणारा असेल तर त्यास राखीव जागेचा फायदा घेता येणार नाही. या प्रवर्गातील उमेदवारास राखीव जागेवर प्रवेश घ्यायचा असेल तर त्यास कार्यकारी दंडाधिकारी किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडून तो उन्नत व प्रगत वर्गात समाविष्ट होत नाही असा उल्लेख असलेले अगदी अलीकडील प्रमाणपत्र (एप्रिल 2024- मार्च 2025) सादर करावे लागेल. या बावतीत संबंधितांनी चुकीची अथवा खोटी माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास त्यांची निवड वा प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द होऊ शकेल. शिवाय तो शिस्तभंगाविषयक कार्यवाहीस पात्र ठरेल.

जर मागासवर्गीयांच्या कोणत्याही प्रवर्गातील राखीव जागा रिक्त राहील्यास त्या उर्वरित मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

उमेदवाराची निवड 10 + 12 च्या गुणांनुसार सामाईक गुणवत्ता यादी खुल्या प्रवर्गाच्या आरक्षणांपर्यंत व उर्वरित यादी मागासवर्गीय आरक्षणानुसार तयार करण्यात येईल

12) **अपंगांसाठी राखीव जागा** :-

Scanned with OKEN Scanner

अ) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) शासन निर्णय क्र. एमईएस 1202/(81) वैसेवा – 1, मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 19 ऑगस्ट 2005 मधील तरतुदीनुसार अपंगासाठी 5 टक्के जागा आरक्षित राहतील. या जागांवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ब) अपंगासाठी राखीव असलेल्या जागांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने त्याच्या अपंगत्वाबद्दल जिल्हा सर्वसाधारण रुग्णालयातील जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय मंडळे/शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक अथवा संचालक ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजीकल मेडीसीन एण्ड रिहॅबिलीटेशन, हाजीअली, मुंबई, यांचे विहीत नमुन्यातील अलीकडील वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत जोडावी.

सक्षम अधिकारी यांनी स्थापन केलेल्या वैद्यकीय मंडळामार्फत उमेदवाराच्या अपंगत्वाची पडताळणी करण्यात येईल. अशा पडताळणीसाठी विशेष वैद्यकीय मंडळापुढे उपस्थित राहण्याचा दिनांक व स्थळ उमेदवारास संबंधित संस्थेमार्फत कळविण्यात येईल.

अपंगांसाठी राखीव असलेल्या जागांवर प्रवेश मिळविण्यासाठी खालील प्रकारात मोडणाऱ्या अपंग व्यक्तीच पात्र असतील. (INC परिपत्रकानुसार)

1) ONLY LOWER EXTREMITY – LOCOMOTER DISABILITY मात्र या प्रकाराचे अपंगत्व किमान 40% ते 50% असणे आवश्यक आहे.

13. **सर्वसाधारण सूचना** :-

1) परिचर्या प्रशिक्षण शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल (परिशिष्ट क्र.2)
2) परिचर्या प्रशिक्षण शाळेत शिकत असलेला विद्यार्थी जर शासकीय नियम व कायद्याविरुध्द असलेल्या एखाद्या राष्ट्रविघातक कार्याशी संबंधित असल्याचे आढळून आले तर त्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्या प्रशिक्षण शाळेतून संस्था प्रमुख काढून टाकू शकतील.
3) नियम 11 मध्ये निर्देशिलेल्या प्रवर्गातील आरक्षित जागांकरीता जे उमेदवार प्रवेश अर्ज सादर करतील त्यांना ते प्रत्यक्षात नमूद केलेल्या जाती व समूहात मोडत असतील तरच त्यासाठीच आरक्षणास पात्र धरण्यात येतील,याची नोंद घ्यावी.
4) परिचर्या प्रशिक्षण शाळेत प्रवेश मिळालेल्या उमेदवारांना संबंधीत परिचर्या प्रशिक्षण शाळेतील प्रशिक्षणार्थी परिचारीकांसाठी विहीत केलेल्या अटीचे पालन करावे लागेल.

5) परिचर्या प्रशिक्षण शाळा ही महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्याशी संलग्न आहे.त्यातुन राबविण्यात येणारे अभ्यासक्रम हे महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी निश्चित केलेल्या विषय व प्रात्यक्षिकांनुसार असतात. सदर अभ्यासक्रम पूर्ण

Scanned with OKEN Scanner

झाल्यानंतरची परीक्षा देखील याच मंडळाकडून घेण्यात येईल व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आवश्यक पदविका महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाकडून वहाल करण्यात येईल.

6) उमेदवारांनी ज्या संस्थेत निवड करण्यात आली असेल त्या संस्थेतून दुसऱ्या संस्थेत स्थानांतराच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

7) उमेदवाराने अभ्यासक्रम मध्येच सोडल्यास रु.11822/- इतका दंड त्यांच्याकडून घेतला जाईल.

8) एखाद्या उमेदवाराने प्रवेश मिळाल्यानंतर, कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम मध्येच सोडल्यास तो उमेदवार महानगरपालिकेतील कोणत्याही परिचर्या शाळेत पुन:प्रवेशास अपात्र राहील.

14. **परिचर्या पाठयक्रम माहिती**

**सुविधा**

**पाठयवेतन** 100-10-120 अधिक 680/- गणवेश भत्ता अधिक 300/- धुलाई भत्ता वसतीगृहात रहाणे बंधनकारक असून राहण्याची व जेवणाची मोफत सुविधा आहे.

**शारीरिक तपासणी**

विद्यार्थीनींची वार्षिक, शारीरीक तपासणी करण्यात येईल. जरुरी असल्यास त्यांना लस टोचणी करण्यात येईल. त्या आजारी पडल्यास संबंधित रुग्णालयात त्यांच्यावर इलाज करण्यात येईल.

**रजा**

विद्यार्थीनीनां महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार तसेच नियमाप्रमाणे रजा अनुज्ञेय राहील.

**शुल्क/खर्च (अंदाजे)**

| | |
|---|---|
| विद्यार्थी नोंदणी शुल्क (Student Enrollment fee) | रु.1000/- |
| गणवेश | रु.7500/- (प्रवेश) |
| पुस्तके | रु.4000/- (प्रति वर्षी) |
| साहित्य सामुग्री | रु.1500/- (प्रति वर्षी) |
| वसतीगृह अनामत रक्कम | रु.3594/- |
| विद्यार्थी परिचारीका कल्याण निधी | रु.3500/- |
| परीक्षा शुल्क | रु.5000/- |
| संगणकीय शिक्षण | रु.1500/- |
| इंग्रजी भाषा विषय | रु.500/- |
| सामाजिक अनुभव | रु.1500/- (प्रति वर्षी) |
| एकूण | **रु.29594/-** |

Scanned with OKEN Scanner

वरील खर्चात बदल होण्याची शक्यता असून तो स्वत: विद्यार्थ्यांनी करावयाचा आहे. यशस्वीरित्या परिचर्या प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी परिचारीकांना मुक्त करण्यात येईल व कोणत्याही बृ.म.न.पा.तील नोकरीची हमी दिली जाणार नाही.

## प्रशिक्षण कार्यक्रम

### कालावधी :-

सदर पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षण कालावधी 3 वर्षे असा आहे (अंर्तवासीता धरुन) यामध्ये सामान्य परिचर्या,सामाजिक आरोग्य आणि प्रसविका यांच्या लेखी व प्रात्यक्षिकांचा समावेश आहे. (अभ्यासक्रमाचा कालावधी व अभ्यासक्रमाचे विषय भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्या ठरावासापेक्ष).

### विशेष नोंद :-

भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या (MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION) ठरावानुसार सदर पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षण कालावधी तसेच अभ्यासक्रमातील विषय बदलण्याची शक्यता आहे याची नोंद घ्यावी.

सामान्य परिचर्या व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रमातील विषय

**प्रथम वर्ष -**

| विषय | तासिका |
|---|---|
| 1) बायोसायन्स | |
| ए) शरिररचना शरिरविज्ञानशास्त्र | 90 |
| बी) सुक्ष्मजीवशास्त्र | 30 |
| 2) बिहेविअरल सायन्स | |
| ए) मानसशास्त्र | 45 |
| बी) सामाजिक शास्त्र | 20 |
| 3) नर्सिंग फाऊंडेशन | |
| ए) मुलभूत उपचर्या शास्त्र | 200 |
| बी) प्रथमोपचार | 20 |
| 4) सार्वजनिक आरोग्य परिचर्या – 01 | |
| ए) सामाजिक आरोग्य परिचर्या | 80 |
| बी) पर्यावरण स्वच्छता | 30 |
| सी) आरोग्य शिक्षण व संवाद कौशल्य | 45 |
| डी) आहारशास्त्र | 30 |

Scanned with OKEN Scanner

## परीक्षा

**प्रथम वर्ष :-**

| पेपर | विषय | आंतरिक गुण | परिषद परीक्षा | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | शरीररचना शास्त्र व शरीरक्रिया शास्त्र आणि सुक्ष्मजीवशास्त्र | 25 | 75 | 100 |
| 2 | मानसशास्त्र आणि समाजशास्त्र | 25 | 75 | 100 |
| 3 | मुलभुत परिचर्या, प्रथमोपचार | 25 | 75 | 100 |
| 4 | सार्वजनिक आरोग्य परिचर्या-01 (पर्यावरण स्वच्छता, आरोग्य शिक्षण व संवाद कौशल्य आणि आहार शास्त्र | 25 | 75 | 100 |
| 5 | कृती – मुलभूत परिचर्या | 50 | 50 | 100 |

**द्वितीय वर्ष :-**

| पेपर | विषय | आंतरिक गुण | परिषद परीक्षा | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय शल्य चिकित्सालिय सुश्रुषा -1 (औषध निर्माणशास्त्र) | 25 | 75 | 100 |
| 2 | वैद्यकीय शल्य चिकित्सालिय सुश्रुषा-2 (विशेषता) | 25 | 75 | 100 |
| 3 | मानसिक आरोग्य आणि मनोविकृती सुश्रुषा | 25 | 75 | 100 |
| 4 | वाल आरोग्य परिचर्या | 25 | 75 | 100 |
| 1 | कृती 1– वैद्यकीय शल्य चिकित्सा परिचर्या | 50 | 50 | 100 |
| 2 | कृती 2– वाल आरोग्य परिचर्या | 50 | 50 | 100 |
| 3 | कृती 3- मानसिक आरोग्य आणि मनोविकृती परिचर्या | 50 | 50 | 100 |
| | | शालेय गुणवत्ता | | |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 5) इंग्रजी शिक्षण | 30 |
| 6) संगणक प्रशिक्षण | 30 |
| 7) सह अभ्यास उपक्रम | 20 |

**द्वितीय वर्ष :-**

| विषय | तासिका |
|---|---|
| 1) वैद्यकीय आणि शल्य चिकित्सा शास्त्र सुश्रुषा-1 (औषध निर्माण शास्त्र सहित) | 130 |
| 2) वैद्यकीय व शल्य चिकित्सा शास्त्र – 2 (विशेष विभाग ) | 130 |
| 3) मानसिक आरोग्य व मनोविकृती सुश्रुषा | 70 |
| 4) बाल आरोग्य | 70 |
| 5) सहकारी अभ्यासेतर | 20 |

**तृतीय वर्ष :-**

| विषय | तासिका | |
|---|---|---|
| 1) प्रसुतीशास्त्र आणि स्त्रीरोगशास्त्र | 140 | भाग 1 |
| 2) सामाजिक आरोग्य सुश्रुषा- 2 | 100 | |
| 3) सह अभ्यास –उपक्रम | 12 | |
| 4) शैक्षणिक व्यवसायातील पध्दत व शिकवण्याचे माध्यम | 20 | भाग 2 |
| 5) संशोधन ओळख | 30 | |
| 6) व्यवसायिक दृष्टीकोन व समायोजन | 30 | |
| 7) परिचर्या प्रशासन व कक्ष व्यवस्थापन | 40 | |

**सूचना माध्यम :-**

सुचना माध्यम हे इंग्रजी असेल.

**प्रत्यक्ष कृती अनुभव :–**

प्रशिक्षण कालावधीच्या दरम्यान विद्यार्थीनींना रुग्णालयामध्ये विविध कक्षामध्ये तिन्ही पाळयांमध्ये अनुभव मिळवण्यासाठी काम करावे लागेल.

प्रत्येक वर्षाच्या शेवटी महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या वतीने परीक्षा घेतली जाईल.

Scanned with OKEN Scanner

**तृतीय वर्ष :-**

| पेपर | विषय | आंतरिक गुण | परिषद परीक्षा | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रसुतीशास्त्र आणि स्त्रीरोग शास्त्र परिचर्या | 25 | 75 | 100 |
| 2 | सामाजिक आरोग्य परिचर्या – 2 | 25 | 75 | 100 |
| 3 | शैक्षणिक व्यवसायातील पध्दती व शिकवण्याचे माध्यम आणि संशोधन ओळख व व्यावसायिक दृष्टीकोन व परिचर्या प्रशासन व प्रभाग व्यवस्थापन | 25 | 75 | 100 |
| 1 | कृती 1 – प्रसुती शास्त्र आणि स्त्रीरोग शास्त्र परिचर्या | 50 | 50 | 100 |
| 2 | कृती 2 – सार्वजनिक आरोग्य परिचर्या- 2 | 50 | 50 | 100 |

Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ठ क्र.1

विशेष सुचना :- सदरचे प्रतिज्ञापत्र फक्त साहाय्यकारी परिचारीका प्रसविका (Auxiliary Nurse Midwife) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवाराने त्यांची निवड झाल्यानंतर रु.100/- च्या मुद्रांक पत्रावर घ्यावे.

### प्रतिज्ञापत्र (नमुना)

मी सही करणार कुमारी / श्रीमती________________________________

असे निवेदन करते की, मी सहाय्यकारी परिचारीका प्रसविका (Auxiliary Nurse Midwife) अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. सध्या मी कोणत्याही शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेत नोकरीत नाही. मी सामान्य परिचारीका व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रम पूर्ण करीत असतांना ही माहीती खोटी आढळून आल्यास माझ्या वर म.न.पा. नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व मला या प्रशिक्षणातून कोणते ही पूर्वसुचना न देता काढून टाकण्यात येईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

आपली विश्वासू

सही________________

दिनांक :-____________

नाव________________

नाव------------------------------------------------------------

वरील माझ्या पाल्याने दिलेले प्रतिज्ञापत्र मी पूर्णपणे वाचले असून मी त्याच्याशी पूर्णपणे सहमत आहे.

दिनांक :

सही------------------------------------------------------------

नाव------------------------------------------------------------

पाल्यांशी नाते------------------------------------------------------

Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ट क्रमांक 2

विशेष सुचना :- सदरचे प्रतिज्ञापत्र निवड झाल्यानंतर उमेदवाराने दयावयाचे आहे.

प्रतिज्ञापत्र (नमूना)

मी असे जाहीर करते की, सदर अभ्यासक्रमाची प्रचलित नियमावली मी पूर्णपणे वाचली असून ती मला मान्य आहे. अर्जातील माहिती मी स्वत: भरली असून ती पुर्णपणे सत्य आहे त्यात काही असत्य माहिती दिल्याचे आढळून आल्यास माझा अर्ज अथवा मला दिलेला प्रवेश रद्द होऊ शकतो याची मला पूर्ण जाणीव आहे.

1) महानगरपालिकेने या परिचर्या शाळेतील नियंत्रणासाठी केलेले व वेळोवेळी करण्यात येणारे सर्व नियम व अटी मला मान्य असून त्यांचे योग्य ते पालन करणे माझ्यावर बंधनकारक राहील.
2) महानगरपालिकेने राष्ट्रहितार्थ केलेले कोणतेही नियम विधी व कायदे यांचे मी योग्यरित्या पालन करीन.
3) जोपर्यंत मी परिचर्या प्रशिक्षण शाळेत विद्यार्थीनी असेन तोपर्यंत माझ्याकडून शाळेत/रुग्णालयात किंवा त्याबाहेर नियमबाहय वर्तन होणार नाही तसे झाल्यास मी विद्यमान वा तात्कालीन म.न.पा. नियम विधी व कायदयानुसार शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र असेल.
4) रगींग (Raging) केल्यास संबंधित विद्यार्थ्यांस पोलीस कारवाई, विद्यालयातून निलंबित/बडतर्फ करण्याची कारवाई अशा कठोर शिक्षांना सामोरे जावे लागेल.
5) वर उपरोक्त 1 ते 4 बाबींचे उल्लंघन झाल्यास संस्थाप्रमुख मला परिचर्या प्रशिक्षण शाळेत कोणतीही पुर्व सूचना न देता काढून टाकण्यात येईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण-------------------------------------

दिनांक-------------------------------------

अर्जदाराची सही

Scanned with OKEN Scanner